# विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे

## Vidyarthi Sahayyak Samiti, Pune



अनंत अमुची ध्येयासक्ती
अनंत अन् आशा

**वार्षिक अहवाल २०२५-२०२६**

www.samiti.org

ISO 9001 : 2015 certified



संस्थापक

**कै. डॉ. अच्युत शंकर आपटे**



**कै. सुमित्रा  केरकर**



**कै. हरिभाऊ फाटक**

# विश्वस्त मंडळ



**पद्मश्री प्रताप पवार**
अध्यक्ष,
सकाळ माध्यम समूह



**भाऊसाहेब जाधव**
कायम विश्वस्त,
अध्यक्ष,
मराठवाडा मित्रमंडळ, पुणे,



**तुकाराम गायकवाड**
कायम विश्वस्त,
उद्योजक



**तुषार रंजनकर**
कार्यकारी विश्वस्त,
उद्योजक



**संजय अमृते**
खजिनदार,
बँकिंग व वित्त क्षेत्र



**रत्नाकर मते**
अभियांत्रिकी सल्लागार



**डॉ. मकरंद फडके**
माहिती तंत्रज्ञान क्षेत्र



**प्रीती राव**
माहिती तंत्रज्ञान क्षेत्र,
सामाजिक कार्यकर्त्या



**डॉ. ज्योती गोगटे**
उद्योजिका



**सुनंदा माने**
संचालक, लाही



**विनया ठोंबरे**
सामाजिक कार्यकर्त्या



**मनोजकुमार गायकवाड**
उद्योजक



**चंद्रशेखर पोतनीस**
माहिती तंत्रज्ञान क्षेत्र,
उद्योजक



**प्रकाश आपटे**
कार्पोरेट सल्लागार,
सामाजिक कार्यकर्ते



**नंदकुमार तळेकर**
आयुर्विमा सल्लागार

# समिती

## समितीचे घोषवाक्य

- सर्वांगीण शिक्षणातून युवा सक्षमीकरण

## ध्येय (Mission)

- समाजाच्या मदतीने आर्थिकदृष्ट्या गरजू आणि होतकरू युवकांच्या सक्षमीकरणासाठी योग्य सुविधा व संधी उपलब्ध करून देणे

## समितीचे धोरण

- योग्य व्यवस्थापन व गुणवत्तापूर्ण कार्यप्रणाली
- शालेय शिक्षणानंतर शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या युवावर्गाची भोजन व निवासाची उत्तम सोय करणे
- समितीची मूल्ये रुजविणे
- जात, धर्म, पंथ निरपेक्ष विकास
- कालानुरूप विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे
- युवकांच्या सक्षमीकरणासाठी व उद्योजकता रुजविण्यासाठी प्रयत्न करणे
- सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असलेल्या व्यक्ती आणि संस्था यांच्यातर्फे आर्थिक तथा सर्वंकष पाठबळ मिळविण्याचे सतत प्रयत्न करणे.

## मूल्ये

- स्वच्छता, समता, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, कृतज्ञता, व्यक्तिमत्त्व विकास, समाजाप्रती उत्तरदायित्व

## हेतू

- उच्चशिक्षणासाठी शहरांत येणाऱ्या गरजू व होतकरू ग्रामीण विद्यार्थ्यांना अत्यल्प दरात वसतिगृह व भोजन यांची उत्तम सुविधा पुरवणे. दुर्बल घटकांतील विद्यार्थी आत्मविश्वासपूर्ण, स्वावलंबी व समाजाचा जबाबदार घटक व्हावेत, यासाठी पोषक वातावरण व तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे. त्यातून सामाजिक स्तर उंचावणे.

### मुखपृष्ठाविषयी

प्रतिकूलतेवर कशी मात करायची हे निसर्ग आपल्याला शिकवतो. आपल्याला उत्तम काही करून दाखवण्याची इच्छाशक्ती, जिद्द असेल तर मार्ग नक्की सापडतो म्हणून अनंत अमुची ध्येयासक्ती. तरुणांमध्ये हा बदल घडवण्याचे काम समिती ७० वर्ष करते आहे.

**Anjali Anturkar**
**President, VSS Foundation USA**
Vidyarthi Sahayyak Samiti Foundation, USA

**Students welfare Association**
**Section 8 company**
Lajptrai Vidyarthi Bhavan, S.No. 103, Near shivaji Housing Society, S. B. Road, Pune 411016

# समितीचे कार्य

ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी पुणे, अहिल्यानगर येथे येणाऱ्या गरीब, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अल्प दरात निवासाची व भोजनाची सोय व्हावी व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, कालानुरूप नोकऱ्या कमी होत असल्याने विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी किमान १० टक्के उद्योजक घडावेत हा समितीचा उद्देश आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून समितीच्या कामाकडे पाहिले जाते. समिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत (क्र. २१९ ई, पुणे) असून संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर आहे.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवत्तेच्या जोरावर काहीतरी ध्येय ठेवून धडपडणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना मदतीच्या हेतूने ज्येष्ठ गणितज्ज्ञ डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी १९५५ मध्ये या कामाला सुरुवात केली.

पहाटे योगासने, संस्थेसाठी रोज अर्धा तास श्रमदान, कमवा व शिका योजनेतील सहभाग, देणगीदार पालकांची महिन्यातून एकदा भेट अशा अनौपचारिक शिक्षणातून विद्यार्थ्यांचा विकास होतो. वाचनालय व अभ्यासिका, संगणक प्रशिक्षण, परदेशी भाषा शिक्षण, सिक्स सिग्मा, वैद्यकीय सुविधा देतानाच खेळ, मान्यवरांची व्याख्याने, गटचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा यातून त्यांचे सक्षमीकरण करत कृतज्ञतेची जाणीव देत सुजाण नागरिक बनविण्याचा प्रयत्न असतो.









# समाजाची साथ



**प्रताप पवार, अध्यक्ष**

हे आर्थिक वर्ष समिती परिवाराला आव्हानात्मक आणि आमची दृष्टी व्यापक करणारे ठरले. आव्हानात्मक यासाठी की, या वर्षात एकाच वेळी वसतिगृहाचे तीन प्रकल्प सुरू होते. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या दृष्टीने ते वेळेत पूर्ण होणे गरजेचे होते. परंतु देणगीदार, हितचिंतक आणि समिती परिवारातील प्रत्येक घटकाच्या सहकार्यामुळे हे आव्हान पेलता आले. अमेरिकेत विद्यार्थी साहाय्यक समिती फाउंडेशन सुरू झाले. स्टुडंटस वेलफेअर असोशिएशन नावाने सेक्शन ८ कंपनीची नोंदणी होऊन काम सुरू झाले. या कार्याचा विस्तार करताना सोबत किती चांगले लोक आहेत याचीही प्रचिती आली. अजून पुढे खूप काही करण्यासारखे आहे, हा आत्मविश्वास दुणावला. संस्थेच्या सत्तर वर्षांच्या प्रवासाचा विचार करताना सर्व मूल्ये तीच ठेवून हा कार्यविस्तार होतो आहे, याचे समिती परिवाराला निश्चितच समाधान आहे. वर्षानुवर्षे निस्पृह भावनेने कार्यकर्ते वेळ देत आहेत. माजी विद्यार्थी संस्थेच्या प्रगतीचा विचार करून नवनवे प्रकल्प मांडत आहेत, हे सारेच आनंद देणारे आहे.

मुलींसाठी वसतिगृहाची सुविधा वाढविण्याचा गेल्या काही वर्षांपासून आमचा प्रयत्न आहे. नवे वसतिगृह शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर पूर्ण क्षमतेने भरले. ३३६ विद्यार्थिनींची व्यवस्था वाढली. महिला सेवा मंडळ या संस्थेसोबत सामंजस्य करार होऊन त्यांच्या जागेत समितीच्या तत्त्वाप्रमाणे एक वसतिगृह सुरू झाले. तेथे ८० मुलींची व्यवस्था वाढली. आता सुमारे ८०० मुलींसाठी व्यवस्था झाली आहे. अहिल्यानगर येथे मुलांसाठीच्या वसतिगृहाचे जानेवारी २०२६ मध्ये उदघाटन होऊन तेथे १२० मुलांची व्यवस्था वाढली आहे. मुलांची एकूण संख्या सुमारे ६०० झाली आहे. या कार्याची माहिती जशी सर्वदूर पोचते आहे तसे देशविदेशातून अनेकजण हे कार्य पाहण्यासाठी येत आहेत. युवा पिढी घडविण्याचे हे काम पाहून अनेकजण अचंबित होतात आणि सढळ हस्ते आर्थिक योगदान देतात. अमेरिकेतील विभावरी आणि गिरीश गायतोंडे परिवाराचे उदाहरण याबाबत बोलके आहे. त्यांना समितीची माहिती समजली. पुण्यात आल्यावर हे कार्य पाहिले आणि भरीव देणगी दिली. एका परिवाराने दिलेली ही आजवरची सर्वात मोठी देणगी आहे. भारतातील युवा पिढीच्या शैक्षणिक सहकार्यासाठी या कुटुंबाने केलेले हे मोठे योगदान संस्थेच्या कामावरचा विश्वास आणि आम्हा सर्वांची जबाबदारी वाढवणारे आहे.

समितीत विद्यार्थी अनौपचारिक शिक्षण घेतात. येथील संस्कारांतून आणि वातावरणामुळे त्यांची जडणघडण होते. समितीतून बाहेर पडल्यावर काही नोकरीत स्थिरावतात, काही व्यवसाय करतात. या विद्यार्थ्यांना उद्योजक घडविण्याच्या दृष्टीने त्यांची मानसिक तयारी करण्याचे काम आम्ही सुरू केले आहे. त्याबरोबरच यातील बहुतांश विद्यार्थी शेतकरी कुटुंबातील असल्याने आधुनिक शेती कशी असावी यासाठी त्यांची दृष्टी तयार व्हावी म्हणून संस्थेच्या जागेत शेती प्रयोगशाळेचा प्रकल्प उभा करण्याचे काम सुरु आहे. समविचारी आणि जबाबदारी स्वीकारून काम करणारे सहकारी सोबत असल्याने एकेक प्रकल्प उभा राहून पुढे पाऊल टाकता येते आहे. अनेक विद्यार्थ्यांना इच्छा असूनही पुण्यापर्यंत पोचता येत नाही म्हणून आता नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नवी मुंबई येथे वसतिगृहे उभारण्याचा मनोदय आहे. आपण सोबत आहात, या विश्वासावर हे संकल्प सोडले आहेत. आपल्या खारीच्या वाट्यातून हे प्रकल्प साकारतील, असा विश्वास आहे. या कार्याला हातभार लावणाऱ्या सर्वांप्रती कृतज्ञता.

# आगळेवेगळे पालकत्व



**तुषार रंजनकर, कार्यकारी विश्वस्त**

समितीचे काम गरजू विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात निवास, भोजन व्यवस्था करणे हे जसे आहे त्यापेक्षा जास्त त्यांचे पालकत्व निभावणे आहे. गेली सात दशके समितीचा यामध्ये दीर्घ अनुभव आहे. स्वच्छता, समता, श्रमप्रतिष्ठा ही समितीची त्रिसूत्री केवळ कागदावरची नाही तर विद्यार्थ्यांच्या दैनंदिनीमधील आहे. इथे विद्यार्थी व्यवस्थापन आहे. विद्यार्थी एकमेकांकडून शिकतात, समृद्ध होतात. कार्यकर्ते, पर्यवेक्षक आणि बाहेरील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ यांचा विद्यार्थ्यांशी होणारा संवाद, त्यांच्या सहवासातून मिळणाऱ्या अनेक गोष्टींचे ज्ञान, थेट कामातील सहभागामुळे विकसित होणारी निर्णयक्षमता आणि एवढे लोक आपल्यासाठी निस्पृहपणे काम करतात हे प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे निर्माण होणारी सामाजिक जाणीव यातून या विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होते. याचे अनेक चांगले अनुभव सोबत आहेत. नुकतीच समितीच्या एका विद्यार्थ्याची जपानमधील पाच कंपन्यांमध्ये निवड झाली. त्यातील एक कंपनी त्याने अंतिम निवडली. त्यात भले इतरांपेक्षा पगार कमी होता, परंतु त्याला तेथील मूल्ये जास्त महत्त्वाची वाटली. या वयात हा मुलगा या गोष्टींचा विचार करतो, याचे विशेष कौतुक वाटले. त्याच्याशी याविषयी बोलल्यावर, समितीतून हे शिकायला मिळाले, असे तो म्हणाला. हे ऐकून आनंद आणि अभिमान वाटला. समितीत जे पेरले जाते त्याची फळे उत्तमच येत आहेत, याची खात्री पटली.

समितीत विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन, संवादकौशल्य, नेतृत्वगुण याविषयी जसे शिकवले जाते तसे बाहेरच्या जगातील गरज आणि आव्हाने ओळखून त्यांना रोबोटिक्स, एआय, परदेशी भाषा, सिक्स सिग्मा अशाही गोष्टींचे शिक्षण दिले जाते. आता शेती प्रयोगशाळा उभारून शेतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येतो याचे प्रात्यक्षिक वसतिगृहाजवळ उपलब्ध करून दिले जाणार आहे. जेणेकरून हे विद्यार्थी आपल्या गावी याविषयी माहिती सांगून त्यांच्या शेतीत असे बदल करू शकतील. त्यातून काही रोजगाराच्या संधी उभ्या राहतील. समितीतील विद्यार्थ्यांचा मोबाइलचा वापर बाहेरच्या या वयोगटातील मुलांपेक्षा निश्चित कमी आहे.कारण त्यांचा येथील वेळ विविध गोष्टींमध्ये गुंफलेला आहे. विविध शाखांतील, अभ्यासक्रमातील विद्यार्थी एकत्र राहत असल्याने इतर शाखांविषयी त्यांना माहिती मिळते तसेच त्यांचा अभ्यास पाहून यांनाही अभ्यासासाठी प्रोत्साहन मिळते. संस्थेचे ध्येय, उद्देश, नियमावली यांची माहिती व्हावी म्हणून सुरुवातीलाच त्यांना जडणघडण पुस्तिका दिली जाते.

समितीत विद्यार्थ्यांना आवश्यक शिस्तीत राहावे लागते. एकदा ही शिस्त अंगवळणी पडली की तिची सवय होते. हे सगळे अनौपचारिक शिक्षणातून घडते. कोणत्याही भेदभावाशिवाय असलेले वातावरण, समवयस्क मित्र करतात, मग आपण केलेच पाहिजे ही अनुभूती आणि आपल्या भल्यासाठी समाज उभा आहे याची सामाजिक जाणीव यातून ही पिढी घडते आणि समाजाचा एक जबाबदार नागरिक होऊन बाहेर पडते. भविष्यात हे विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात गेले तरी तेथे त्यांचा वेगळा ठसा उमटतो. कृतज्ञतेतून ते परत संस्थेकडे येतात आणि आपल्या परीने सहकार्य करतात. त्यामुळे असे आगळेवेगळे पालकत्व निभावताना आणि त्याचे परिणाम पाहताना समितीतील प्रत्येक घटकाला आत्मिक समाधान मिळते. कामातला आनंद वाढतो.

# वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या



डॉ. अच्युत शंकर आपटे वसतिगृह — मुली १६२*



सुमित्रा सदन — मुली १२५*



श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृह — मुली ३३६*



कै. म. कृ. ऊर्फ मधुभाऊ चौधरी, मुलींचे वसतिगृह — मुली ६०*



लाला लजपतराय विद्यार्थी भवन — मुले १४२*



पी. डी. कारखानीस वसतिगृह — मुले २०८*



हरिभाऊ फाटक वसतिगृह — मुले १२३*



मेधावी वसतिगृह — मुली ८०*



कल्याणराव जाधव स्मृती भवन, अहिल्यानगर — मुले १२०*

७३४ + ५०३ = १२३७*

*प्रवेशित

एकूण क्षमता १३५६

# जिल्हा, प्रदेशनिहाय विद्यार्थी

● मुली ● मुले

| जिल्हा | मुली | मुले |
|---|---|---|
| धुळे (१८) | १३ | ५ |
| जळगाव (३३) | १७ | १६ |
| छ.संभाजीनगर (३८) | १६ | २२ |
| जालना (२३) | १२ | ११ |
| अकोला (७) | २ | ५ |
| नाशिक (६३) | ३६ | २७ |
| नंदुरबार (३) | २ | १ |
| बुलढाणा (२९) | १८ | ११ |
| इतर राज्यांतून (८) | ५ | ३ |
| अमरावती (४) | २ | २ |
| अहिल्यानगर (१९१) | ११६ | ७५ |
| वर्धा (९), नागपूर (२) | ६ ३ | २ ० |
| ठाणे (२), | १ | १ |
| भंडारा (३), गोंदिया (१) | ३ ० | १ ० |
| पुणे (३३२) | २११ | १२१ |
| वाशिम (९) | ४ | ५ |
| रायगड (९) | ६ | ३ |
| हिंगोली (११) | २ | ९ |
| गडचिरोली (३) | १ | २ |
| सातारा (५८) | ४३ | १५ |
| परभणी (१९) | ८ | ११ |
| चंद्रपूर (१३) | १० | ३ |
| सिंधुदुर्ग (७), रत्नागिरी (२) | ५ २ | २ ० |
| सोलापूर (७२) | ४६ | २६ |
| लातूर (४९) | ३१ | १८ |
| यवतमाळ (२२) | १५ | ७ |
| कोल्हापूर (१३) | ७ | ६ |
| सांगली (१४) | ८ | ६ |
| धाराशिव (५८) | ३७ | २१ |
| बीड (९०) | ३६ | ५४ |
| नांदेड (२२) | १० | १२ |




## एकूण : ७३४ + ५०३ = १२३७



# अभ्यासक्रमानुसार विद्यार्थी यादी




एकूण : ७३४ + ५०३ = १२३७

पुण्यातील एकूण १०७ शैक्षणिक संस्थांमधून ७३४ मुली आणि ५०३ मुले शिक्षण घेत आहेत. त्यांची समितीत निवास, भोजनाची व्यवस्था. तसेच त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध उपक्रम. संस्थानिहाय विद्यार्थ्यांची सविस्तर यादी पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करावा.

## ठळक संस्था

| संस्था | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|
| शासकीय तंत्रनिकेतन | १०९ | ७८ | १८७ |
| फर्ग्युसन कॉलेज | ९६ | ४७ | १४३ |
| मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस सायन्स अँड कॉमर्स — शिवाजीनगर | ८८ | ४६ | १३४ |
| मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस सायन्स अँड कॉमर्स — गणेशखिंड | ४१ | ३५ | ७६ |
| पी इ एस मॉडर्न कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, पुणे | २७ | ३७ | ६४ |

# समितीच्या वाटचालीतील प्रगतीदर्शक घटना

**१९५५** – उच्च शिक्षण घेणाऱ्या काही होतकरू, गरीब विद्यार्थ्यांची जेवणाची सोय करण्यापासून समितीच्या कामाची सुरुवात

**१९५७** – जून महिन्यात सर परशुराम महाविद्यालयाच्या भोजनालयात गरजू मुलांसाठी पहिले भोजनालय सुरू

**१९६२** – फर्ग्युसन रस्त्यावर बंगला भाड्याने घेऊन ४५ विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था

**१९६६** – **१५ फेब्रुवारी :** श्री. हरिभाऊ फाटक यांच्या हस्ते लाला लजपतराय विद्यार्थी भवनचे भूमिपूजन

**१९६८** – **८ ऑक्टोबर :** श्री रावसाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. पु. ल. देशपांडे यांच्या हस्ते लाला लजपतराय विद्यार्थी भवनचे उद्घाटन

**१९७०** – **१३ जून :** पं. हृदयनाथ कुंझरु यांच्या हस्ते मॉडेल कॉलनीतील मुलींसाठीच्या वसतिगृहाचे उद्घाटन.

**१९७९** – २५ डिसेंबर : प्रसिद्ध विधीज्ञ श्री. नानी पालखीवाला यांच्या हस्ते मुलांसाठीच्या नवीन वसतिगृह इमारतीचे उद्घाटन.

**१९८०** – समितीच्या घटनेत बदल. उद्दिष्टामध्ये विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास, शिस्त व शारीरिक श्रमाची प्रतिष्ठा

**१९८१** – **२४ डिसेंबर :** माजी उपराष्ट्रपती डॉ. एम. हिदायतुल्ला यांच्या हस्ते रौप्य महोत्सव समारंभ

**१९८२** – शारीरिक व मानसिक स्वास्थ्य आणि संतुलनासाठी समितीच्या विद्यार्थ्यांसाठी योगासन वर्ग

**१९८९** – मुलींच्या वसतिगृहावर एक मजला वाढविण्यात आला त्याचे उद्घाटन व वसतिगृहाचे "सुमित्रा सदन" असे नामकरण प्रमुख पाहुण्या श्रीमती मृणाल गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

**१९८९** – समितीतील सर्व विद्यार्थ्यांना कमवा व शिका अनिवार्य

**२००५** – २० सप्टेंबर सुवर्ण महोत्सव प्रारंभ हस्ते ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर

**२००६** – **२३ सप्टेंबर :** श्री. बाबा कल्याणी यांच्या हस्ते पी. डी. कारखानीस वसतिगृहाचे उद्घाटन.

**२०१२** – हरिभाऊ फाटक वसतिगृह बांधकाम पूर्ण

**२०१५** – **२६ जानेवारी :** ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या उपस्थितीत हीरक महोत्सवी वर्षाचे उद्घाटन

**२०१९** – **८ नोव्हेंबर :** संस्थापक डॉ. अच्युत शंकर आपटे जन्मशताब्दी सांगता समारंभ, उपस्थिती डॉ. अशोक मोडक

**२०२४** – **७ जुलै :** कै. म. कृ. उर्फ मधुभाऊ चौधरी मुलींचे वसतिगृह, अहिल्यानगर उद्घाटन हस्ते डॉ. प्रमोद व सौ. परिमल चौधरी

**२०२५** – १३ ऑक्टोंबर : श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृह उद्घाटन हस्ते सौ. विभावरी व श्री. गिरीश गायतोंडे. विजय पुसाळकर कक्षाचे उद्घाटन हस्ते तनुजा पुसाळकर

**२०२६** – **२६ जानेवारी :** कल्याणराव जाधव स्मृती भवन, अहिल्यानगर उद्घाटन हस्ते सौ. सुवर्णा व श्री. विनोद जाधव

# सन २०२५-२६ मधील महत्त्वाच्या घटना

## मशीन लर्निंग, एआयवर विशेष सत्र

२७ एप्रिल रोजी समितीच्या मोडक सभागृहात मशीन लर्निंग आणि जनरेटिव्ह एआय या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले. डॉ. भूषण गरवारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळा

समितीच्या कार्यकर्त्यांसाठी ३ मे रोजी लजपत संकुलातील पुसाळकर हॉलमध्ये कार्यशाळा झाली. ३६ कार्यकर्ते उपस्थित होते. तुकाराम गायकवाड, संजय अमृते, रवींद्र नामजोशी, रत्नाकर मते, तुषार रंजनकर, स्नेहा फडके यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

## रक्तदान शिबिर

माजी पर्यवेक्षक आणि विश्वस्त रमाकांत तांबोळी यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त माजी विद्यार्थी मंडळातर्फे लजपत संकुलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरात ३८ बाटल्या रक्त संकलित झाले.

## विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमांची आखणी

विद्यार्थी विकास केंद्रातर्फे विद्यार्थ्यांसाठी २०२५- २६ या वर्षातील सात महिन्यांच्या कार्यक्रमाची आखणी केली. चार महिने जीवनकौशल्ये, संवादकौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, करिअर सज्जता ही अनिवार्य सत्रे, तर तीन महिने ऐच्छिक पूरक अभ्यासक्रम, आवडीनुसार कौशल्य विकास अशा सत्रांचे आयोजन केले.

## 'मोबाईल व्यसनमुक्ती' पुस्तकाचे प्रकाशन

समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर व माजी विद्यार्थी नवनाथ जगताप लिखित, रुद्र प्रकाशनातर्फे प्रकाशित 'मोबाईल व्यसनमुक्ती' या पुस्तकाचे प्रकाशन ५ ऑगस्टला



प्रसिद्ध लेखक व वक्ते अच्युत गोडबोले व समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते झाले.

## ज्ञानसत्रात नामांकित वक्त्यांची व्याख्याने

पर्यावरणपूरक गणेशोत्सवादरम्यान तीन दिवस ज्ञानसत्राचे आयोजन केले होते. मकरंद टिल्लू, मोनिका जोशी, स्वानंद गुधाटे, प्रसाद चव्हाण आणि तनय ललवाणी, राजेंद्र उत्तूरकर यांची स्टँड- अप कॉमेडी- एक कला, ड्रोन आणि नवकल्पना, मराठा आरमार- युनेस्को मान्यताप्राप्त १२ किल्ले, पु. ल. देशपांडे : कथारंग या विषयांवर व्याख्याने झाली.

## विद्यार्थ्यांचे कौतुक

विविध उपक्रमांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची वसतिगृहनिहाय निवड करून त्यांना गौरविण्यात येते. ८ ऑक्टोबर रोजी लजपत संकुलातील पुसाळकर हॉलमध्ये लजपत, पीडी कारखानीस आणि हरिभाऊ फाटक वसतिगृहातील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपक शिकारपूर उपस्थित होते.

## टीम बिल्डिंग उपक्रम

११ व १२ सप्टेंबर रोजी 'टीम बिल्डिंग मास्टर क्लास' ही कार्यशाळा झाली. डॉ. विनय आणि सौ. शुभांगी कोपरकर यांनी घेतलेल्या या कार्यशाळेत सर्व पर्यवेक्षक, कार्यकर्ते आणि पदाधिकारी सहभागी झाले होते.

## अभियंता दिवस साजरा

२८ सप्टेंबरला वादविवाद स्पर्धा, अभियंत्रिकी शाखांविषयी विचारमंथन, इंजिनिअरिंग वॉल ऑफ फेम अंतर्गत स्टार्टअप आयडिया, प्रॉब्लेम- सोल्युशन, प्रोजेक्ट आणि पोस्टर प्रेझेंटेशन अशा विविध उपक्रमांनी अभियंता दिवस साजरा झाला. यावेळी पवन दळवी, डॉ. रवींद्र राजहंस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अभियांत्रिकी क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणारे समितीचे माजी विद्यार्थी जे. व्ही. ऊर्फ राजू इंगळे, दत्तात्रय ढोकरे, सुनील चोरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

## मोरडे फूड्स प्लांटला भेट

उद्योजकता विकास केंद्रांतर्गत ५० विद्यार्थ्यांनी २२ नोव्हेंबरला मंचर येथील मोरडे फूड्स प्लांटला भेट दिली. मोरडे फूड्सचे संचालक हर्षल मोरडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत असतानाच त्यांना उद्योगासाठी प्रेरणाही दिली.




## प्रशिक्षकांविषयी कृतज्ञता

विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला, विचारसरणीला आणि करिअर नियोजनाला बळकटी प्राप्त करून देण्यासाठी विद्यार्थी विकास केंद्रातर्फे विविध मार्गदर्शन सत्रांचे आयोजन केले. या सत्रांमध्ये सहभागी झालेले प्रशिक्षक, विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटसाठी मदत करणारे रिक्रुटर्स, तसेच इतर कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यासाठी १५ नोव्हेंबर रोजी कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन केले होते.



## डॉ. भाटिया यांचे मार्गदर्शन

स्वातंत्र्यदिनी मुलींच्या नवीन वसतिगृहात झेंडावंदन कार्यक्रमाला सनराईज कँडल्स अँड ओशोनिक व्हिजन फॉर ब्लाइंड वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक डॉ. भावेश भाटिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आयुष्यात यश साध्य करायचे असेल, तर फक्त स्वप्न पाहू नका; ती पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल करीत राहा, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. समितीचे हितचिंतक पद्माकर जावडेकर यांच्या परिवाराकडून ओंकार शिंदे, मानसी जाधव यांना उत्तम विद्यार्थी पुरस्कार देऊन सन्मानित केले. डॉ. अ.शं. आपटे वसतिगृहात कर्नल दीनानाथ सिंग, सुमित्रा सदनमध्ये विनया ठोंबरे, लजपत भवनमध्ये श्रीधर कुलकर्णी, मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहात डॉ. अंशू मुळे आणि कल्याणराव जाधव वसतिगृहात सामाजिक कार्यकर्ते श्याम असावा यांच्या हस्ते झेंडावंदन झाले.

## स्वप्ने आणि मूल्ये यांना 'एआय'ची साथ

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार उद्योजकता विकास कक्षाच्यावतीने ११ जानेवारीला श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात चौथी उद्योजकता परिषद झाली. "Entrepreneurship 2.0 : Human Wisdom, Accelerated by AI" ही यंदाच्या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना होती.

## गावाच्या अभ्यासातून उद्योजकतेकडे

समितीच्या विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुटीत त्यांच्या गावाचे सविस्तर सर्वेक्षण करण्याविषयी असाइनमेंट दिली होती. यातून विद्यार्थ्यांना अनुभवसंपन्न ज्ञान आणि वास्तवाचे भान मिळाले. बाजारपेठेतील संधी लक्षात आल्या. डेटा, अनुभव आणि निरीक्षण यांच्या आधारे विचार करण्याची सवय लागली.



## गायतोंडे वसतिगृह, पुसाळकर हॉलचे उद्घाटन

समितीच्या श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे मुलींच्या वसतिगृहाचे कोनशिला अनावरण १३ ऑक्टोबर रोजी झाले. यावेळी अमेरिकास्थित देणगीदार गिरीश गायतोंडे, विभावरी गायतोंडे आणि परिवार तसेच समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. याच वसतिगृहातील विजय पुसाळकर हॉलचे उद्घाटनही यावेळी झाले. स्नेहा फडके, अश्विनी सानप, डॉ. संगीता बर्वे, सुरेखा भणगे, गायत्री पाठक या माजी विद्यार्थिनींना यावेळी मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

## जल्लोष क्रीडा महोत्सवाचे आयोजन

विद्यार्थी विकास केंद्राच्या क्रीडा गटाच्या वतीने २१ डिसेंबर ते ३ जानेवारी दरम्यान 'जल्लोष क्रीडा महोत्सव २०२५-२६' आयोजित करण्यात आला. यामध्ये क्रिकेट, खोखो, कबड्डी, व्हॉलीबॉल या मैदानी खेळांसह बॅडमिंटन, बुद्धिबळ, कॅरम, टेबल टेनिस, टेनिकॉईट, शॉटपुट अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. या क्रीडा महोत्सवात पाचशेपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला.

## मुलींनी केल्या पणत्या

समितीच्या अहिल्यानगरमधील कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहातील मुलींनी सुंदर नक्षीकाम करून रंगविलेल्या हजार पणत्या एका ग्राहकाने खरेदी करून स्नेहालय संस्थेला दिल्या. कमवा व शिका योजनेअंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.

## देणगीदार, हितचिंतकांसाठी गाण्याचा कार्यक्रम

समितीने देणगीदार आणि हितचिंतकांसाठी २९ डिसेंबर रोजी 'शतजन्म शोधताना' या सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. 'शतजन्म शोधताना' या कार्यक्रमाची संकल्पना संगीत संयोजक, दिग्दर्शक देवेंद्र भोमे यांची होती. कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध अभिनेत्री, कवयित्री स्पृहा जोशी यांनी केले. गणेश कला क्रीडा केंद्रात सुमारे दोन हजार रसिक उपस्थित होते. कार्यक्रमाला समितीचे पदाधिकारी आणि प्रायोजक क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युर्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक भूषण वाणी आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.

## सर्व वसतिगृहांमध्ये सांस्कृतिक स्पर्धा

विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने १ ते १८ डिसेंबर दरम्यान समितीच्या सर्व वसतिगृहांमध्ये सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते. समितीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच वेळी सर्व वसतिगृहांमध्ये या स्पर्धा झाल्या. त्यातून ६५० स्पर्धकांना आपले कौशल्य सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळाले. या स्पर्धांमधून ५२ विजेत्या स्पर्धकांची निवड झाली. उन्मेष युवा महोत्सवामध्ये स्पर्धेची अंतिम फेरी झाली. या स्पर्धांसाठी ४८ परीक्षकांना आमंत्रित केले होते.

## प्रवीण तरडे यांच्याशी संवाद

विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने अभिनेते, लेखक-दिग्दर्शक प्रवीण तरडे यांच्याशी विशेष संवादाचे आयोजन करण्यात आले होते. लजपत विद्यार्थी संकुल येथे हा कार्यक्रम झाला.



## समितीची गुढी सातासमुद्रापार

अमेरिकेत राहणाऱ्या समितीच्या हितचिंतकांना 'कमवा व शिका' योजनेत मुलींनी तयार केलेल्या गुढी उभारण्याची संधी मिळाली. अमेरिकेतील हितचिंतक, ॲन अर्बर मराठी मंडळाचे संस्थापक सदस्य भूषण कुलकर्णी आणि स्वाती कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

## 'उन्मेष' युवा महोत्सव

युवकांच्या ऊर्जेला योग्य दिशा देणारा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा उन्मेष युवक महोत्सव २२, २३ आणि २४ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत प्रभू मानखेडकर, ॲड. पुष्कर पाटील तर विशेष अतिथी अभिनेत्री मीरा सारंग उपस्थित होते.

## कल्याणराव जाधव स्मृती भवनाचे उद्‌घाटन

अहिल्यानगरमध्ये कल्याणराव जाधव स्मृती भवन या मुलांसाठीच्या वसतिगृहाचे उद्‌घाटन २६ जानेवारीला झाले. दुबईस्थित उद्योजक विनोद जाधव यांनी वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून उभारलेल्या या वसतिगृहात १२० विद्यार्थ्यांची सोय होणार आहे. या वास्तूच्या कोनशिलेचे उद्‌घाटन विनोद जाधव, त्यांच्या पत्नी सौ. सुवर्णा जाधव, बंधू विशाल जाधव यांच्या हस्ते झाले. फिशर मेजरमेंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. या कंपनीच्या देणगीतून उभारलेल्या संगणक कक्ष व ग्रंथालयाचे उद्‌घाटन यावेळी कंपनीचे राकेश भान आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे वसतिगृहातील दोन खोल्यांचे उद्‌घाटन विनोद जाधव आणि समितीचे माजी विद्यार्थी विजय कदम यांच्या हस्ते झाले.





## रॉक क्लायंबिंगमध्ये २७ विद्यार्थ्यांचे यश

पुण्यातील The Alpinist Mountaineering Institute of Pune यांच्या वतीने ३०, ३१ जानेवारी व १, २ फेब्रुवारी रोजी बेसिक रॉक क्लायंबिंग सर्टिफिकेट कोर्सचे आयोजन केले होते. या उपक्रमात समितीच्या पुण्यातील वसतिगृहांतून एकूण २० मुली व ७ मुलांनी सहभाग घेतला. या तुकडीचे नेतृत्व प्रणय पाले यांनी केले. दोन वेळा एव्हरेस्ट सर करणारे भगवान चवले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध साहसी उपक्रम पूर्ण केले. कोर्सच्या चौथ्या दिवशी घेण्यात आलेल्या परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम गुणांनी यश संपादन केले.

## यशस्वी शाळांचा गौरव

हैदराबाद येथील सोहम अकॅडमी ऑफ ह्युमन एक्सलन्स ही संस्था गेल्या वर्षापासून विद्यार्थी साहाय्यक समितीबरोबर कार्यरत आहे. या संस्थेच्या रोबोटिक्स इन अकॅडमिक्स या उपक्रमांतर्गत पुण्यातील दहा शाळांमध्ये रोबोटिक्स प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. समितीतील ८० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. याच विद्यार्थ्यांनी रोबोटिक्स शिक्षक म्हणून विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमात सहभागी झालेल्या काही शाळांनी ग्रँड मास्टर लेव्हल म्हणजेच सात रोबोटिक्स चॅलेंजेस यशस्वीरित्या पूर्ण केले. अव्वल आलेल्या तीन शाळांना २८ फेब्रुवारी रोजी हैदराबादला रोबोटिक्स प्रदर्शनामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. या उपक्रमातील सहभागी शाळा व विद्यार्थ्यांचा सत्कार समितीत करण्यात आला.

# माजी विद्यार्थ्यांचे यश

## समितीमुळे शिक्षण सुकर



पारगाव मेमाणे (ता. पुरंदर) हे माझे गाव. घरची परिस्थिती जेमतेम. गरिबी म्हणजे वडिलांच्या अंगात कायम कोपरी आणि जोड दिलेले धोतर असायचे. माझे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण गावातच झाले. अभ्यास सांभाळून शेतीतील कामे केली. आठवीनंतर इंग्रजीचे शिक्षण सुरू झाले. त्यावेळी मला दहावीत इंग्रजीत १०० पैकी ७७ मार्क मिळाले. पुणे जिल्ह्यात बोर्डात दुसरा होतो. ११ वी सासवडला तर १२ वी स. प. महाविद्यालयात झाली. गावातील ओळखीच्या लोकांकडे वर्षभर राहिलो.

प्रथम वर्ष बी.एस्सी.ला प्रवेश घेतला त्या दरम्यान वडिलांचे निधन झाले. शिक्षण थांबवून गावी गेलो. शेळ्या वळण्याची जबाबदारी माझ्यावर आली. एकदा वनविभागाच्या हद्दीत शेळ्या गेल्याने वनअधिकाऱ्याने त्या पकडल्या. त्यांच्याशी थोडा इंग्रजीत संवाद साधल्यावर त्यांना आश्चर्य वाटले. परिस्थिती ओळखून त्या विकास जगताप अधिकाऱ्याने समितीचा संदर्भ दिला आणि पुढील शिक्षण सुकर झाले. समितीत मिळणारा वरण भात, चपात्या, दोन भाज्या घरी कधीतरीच मिळायच्या. येथे मी भरपेट जेवण करीत असे. येथील चार तास काम, कमवा शिका आणि इतर उपक्रमांमुळे मी घडलो. बीएससी केमिस्ट्री पूर्ण केले. शिक्षक म्हणून काही काळ नोकरी केली. पुढे वैज्ञानिक सहाय्यक म्हणून नोकरीला सुरुवात झाली. संसारवेलीवर एक मुलगी, एक मुलाचे फूल लागले. मुलगा ऋतुराज क्रिकेटमध्ये नाव करील असे स्वप्नातही वाटले नव्हते. पण त्याचे ते स्वप्न पूर्ण करण्यात सहकार्य करता आले. त्याला वाढदिवसाला कधीही नवा ड्रेस घेतला नाही, पण दरवेळी क्रिकेटचे साहित्य घेतले. कष्टाने तो आज याठिकाणी पोचला आहे. खेडूत ते क्रिकेटर हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. सकारात्मक दृष्टिकोन, अपयशाने खचून न जाता उठून परत धावण्यासाठी लागणारी इच्छाशक्ती असेल तर कितीही विपरीत परिस्थितीवर मात करून इच्छित स्थळी आपण निश्चित पोचू शकतो. हे माझ्या आयुष्याचे उदाहरण आहे.

**- दशरथ गायकवाड,** पुणे

## चांगली मूल्ये अंगी बाणली



सातवी ते दहावी दरम्यान मला CASP या संस्थेकडून शैक्षणिक साहित्य मिळत असे. त्यावेळी शैक्षणिक प्रगती तपासणीसाठी मी सौ. तांबोळी मॅडम यांना भेटत असे. महाविद्यालयीन शिक्षणावेळी त्यांच्याकडूनच मला समितीबद्दल माहिती मिळाली. १९८५ मध्ये त्यावेळच्या नवीन वसतिगृहात माझा प्रवेश झाला. सुरवातीला योगासने, खोली स्वच्छता, विंग+बाथरूम स्वच्छता, स्वावलंबन, चार तास काम थोडे अवघड गेले, पण कालांतराने चांगले जमू लागले. आता ती एक आनंददायी सवय बनली आहे. समितीच्या वास्तव्यात व्यापक व सर्वांच्या हिताचे विचार करण्याची, समता, श्रमप्रतिष्ठा, निरपेक्षपणे चांगल्या कामात सहभागी होण्याची अनेक उदाहरणे बघितली. त्याचे महत्व कळले व ते मूल्य अंगी बाणले गेले.

TATA-Honeywell मध्ये (Tr. Engineer - Dy. Manager) ९ वर्षे नोकरी केली. त्यावेळी १९९५ मध्ये अमेरिकेत Honeywell च्या फॅक्टरीमध्ये २ महिने काम करायची संधी मिळाली. नंतर सॉफ्टवेअरचा १ वर्षाचा postgraduation course केला आणि IT मध्ये switch केले. गेली २८ वर्षे IT मध्ये काम करत आहे. Wipro, Oracle, Accenture मध्ये काम करत असताना अनेकदा USA, Germany, Belgium , Netherland येथे वास्तव्य केले. लहान वयात मिळालेल्या या inernational exposure मुळे दृष्टिकोन व्यापक बनण्यासाठी मदत झाली. सध्या टेक महिंद्रामध्ये प्रि. टेक आर्किटेक्ट म्हणून जबाबादारी आहे. माझी पत्नी शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून, मुलगा अभियांत्रिकी क्षेत्रात काम करत आहे. माजी विद्यार्थी मंडळाच्या माध्यमातून समितीशी १९९१ पासून नियमितपणे जोडलेला आहे. वेळोवेळी होणाऱ्या समितीच्या उपक्रमात यथाशक्ती सहभाग घेताना आनंद व समाधान वाटते. समितीत असताना मी पाल्य म्हणून पालक भेटीला जात असे. आता माझ्याकडे जेव्हा विद्यार्थी पालक म्हणून भेटायला येतात, तेव्हा एक वर्तुळ पूर्ण झाल्यासारखे वाटते.

**- अनिरुध्द वैद्य,** पुणे

## माजी विद्यार्थिनी म्हणून अभिमान



